# शेवगा लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान

प्रा. दत्तात्रय राऊत   प्रा. संदेश घोरपडे   प्रा. महेश चव्हाण
सहाय्यक प्राध्यापक
श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय पानीव, सोलापूर

शेवगा हे एक अल्प कालावधीत अल्पखर्चात अत्यल्प पाण्यात शाश्वत उत्पादन देणारे भाजीपीक आहे, शेवगा पानांत 'अ' जीवनसत्व पुरेसे असते. संत्र्याच्या सात पट जीवनसत्व 'क', दुधाच्या चारपट कॅल्शियम व दुप्पट प्रथिने आणि केळीपेक्षा तीन पट पोटॅशियम असते. शेवगा पानाचा रस हे एक उत्तम टॉनिक आहे. शेवग्याच्या उकडलेल्या शेंगा व शेवगा शेंगाची भाजी यात ॲन्टिबायोटिक्स सारखी प्रतिजैविके असतात. त्यामुळे घसा व त्वचारोग बरे होतात. वाळलेल्या बियांपासून घन स्वरूपाचे तेल निघते. या स्वच्छ, रंगहीन व घट्ट तेलाला 'बेन ऑईल' म्हणतात त्याचा उपयोग घड्याळात वंगण म्हणून करतात. शेवग्याचे झाड बहुवर्षीय असून इतर झाडांप्रमाणे कणखर किंवा कठीण खोडाचे नाही.

सध्या शेवगा निर्यातीबाबतच मानके निश्चित केलेली नाहीत. तरीसुद्धा पसंती आणि मागणी लक्षात घेता निर्यातीसाठी खालीलप्रमाणे मानके.

- शेंगांचा रंग आकर्षक हिरवा गडद हिरवा असावा.
- शेंगा मध्यम लांबीच्या ३० ते ४५ सें.मी., मध्यम जाडीच्या आणि गोल आकाराच्या असाव्यात. अधिक लांबीच्या किंवा आखूड शेंगा पसंतीला उतरत नाहीत.
- शेंगा चविष्ट, स्वादिष्ट तसेच गराचे प्रमाण जास्त म्हणजे भरीव असाव्यात. बियांची संख्या कमी असावी तसेच बिया कठीण नसाव्यात.
- शेंगांतील गर मऊ आणि चविष्ट असावा परंतु तुरट किंवा कडवट नसावा, साल पातळ असावी.
- शेंगांवर रोगट ठिपके आणि किडीचा प्रादुर्भाव झालेला नसावा.
- शेंगांची टिकाऊ क्षमता अधिक असावी.

### जमीन:

- हलक्या जमिनीपासून मध्यम ते भारी जमीन पिकाला मानवते,
- पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन लागवडीसाठी निवडावी.
- पाणी साचणाऱ्या जमिनीत लागवड यशस्वी होत नाही. सेंद्रिय अंश अधिक असलेली जमीन उपयुक्त असते.
- जमिनीचा सामू ५.५ ते ७.५ असावा.

### लागवड:

- शेवग्याची लागवड रोपे किंवा बिया लावून केली जाते. पारंपरिक पद्धतीत लागवड ही जातिपरत्वे ४ x ४ मीटर किंवा ५ x ५ मीटर अंतरावर करतात.
- मात्र आधुनिक लागवड पद्धतीत दोन रांगेतील आणि रांगेमधील दोन झाडांमधील अंतर २ ते २.५ मीटर (२ x २ मी. किंवा २.५ x २.५ मी.) ठेवतात व लागवडीसाठी खड्डा ४५x४५x४५ से मी खोदावा.
- अशा प्रकारे झाडांची संख्या हेक्टरी १६०० ते २५०० (अति दाट लागवड पद्धत) राखावी.
- अशा प्रकारच्या लागवडीमध्ये झाडांची दरवर्षी छाटणी करावी.
- खड्यात ५ किलो कंपोस्ट खत किंवा सेंद्रिय खत आणि स्फुरदयुक्त खत १ किलो मातीत मिसळून खड्डा निम्मा भरावा.
- बियाणे किवा रोपे जोमदार ५० ते १०० सें.मी. उंचीची आणि ४५ ते ६० दिवस वयाची लावावीत. लागवडीनंतर खड्डा पूर्ण भरावा.
- वाऱ्याने झाडे मोडू नयेत म्हणून त्वरित काठीने आधार द्यावा.

### सुधारित जाती:

- कोइमतूर-१, कोइमतूर-२, पी.के.एम.-१ आणि पी.के.एम.-२, ओडीसी या जाती कोइमतूर येथील तमिळनाडू कृषी विद्यापीठाने प्रसारित केल्या आहेत. या जातीची झाडे ५ ते ६ मीटर उंच वाढतात, झाडास १६ ते २२ फांद्या असतात.
- पी.के.एम.-२ ही जात लागवडीपासून ६-७ महिन्यात शेंगा देणारी आहे. या वाणाच्या शेंगा रुचकर व स्वादिष्ट आहेत. शेंगा ५०-६० सें.मी. लांब व गर्द हिरव्या रंगाच्या असल्यामुळे या शेंगांना चांगला बाजारभाव मिळतो.

### खत व्यवस्थपान:

- शेवग्याला दरवर्षी शेंगा लागत असतात. चांगल्या वाढीसाठी आणि दर्जेदार शेंगांसाठी झाडांना दरवर्षी योग्य प्रमाणात खते द्यावीत.
- सेंद्रिय खते अधिक प्रमाणात द्यावीत.
- पहिल्या वर्षी ५ किलो शेणखत, २५ ग्रॅम नत्र, २० ग्रॅम स्फुरद आणि २५ ग्रॅम पालाश प्रति झाडास द्यावे.
- ही मात्रा झाडाच्या वयानुसार वाढवावी.
- पाचव्या वर्षी प्रत्येक झाडाला २० ते २५ किलो शेणखत किंवा कंपोस्ट खत, १२५ ग्रॅम नत्र, १०० ग्रॅम स्फुरद आणि १२५ ग्रॅम पालाश द्यावे.
- खते बांगडी पद्धतीने पावसाळ्याच्या सुरुवातीस किंवा ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये द्यावीत.
- लागवडीतील झाडांच्या संख्येनुसार हेक्टरी खतांची मात्रा निश्चित करावी.

### पाणी व्यवस्थापन:

- शेवगा हे कोरडवाहू (पावसाच्या पाण्यावर वाढणारे) झाड आहे. परंतु अधिक उत्पादनासाठी पाणी देणे फायदेशीर ठरते.
- हिवाळी आणि उन्हाळी हंगामात जमिनीच्या मगदुराप्रमाणे आठवड्यातून १ किंवा २ आठवड्यांच्या अंतराने पाणी देणे पुरेसे होते.

### झाडांची छाटणी आणि आकार देणे:

- शेवग्याच्या झाडांची वाढ जलद गतीने होत असते. रोपांची उंची भरमसाठ वाढते. म्हणून झाडांना योग्य आकार प्राप्त होण्यासाठी छाटणी करणे जरुरीचे आहे.
- उंची मर्यादित ठेवून शेंगांची काढणी सुलभतेने करता येते.
- शेंगांचा दर्जा सुधारून उत्पादनात वाढ होते. लागवडीच्या पहिल्या वर्षी २ ते ३ महिन्याने साधारणपणे १ मी. उंचीवर खोडाची छाटणी करावी.
- त्यानंतर शेंगांची काढणी केल्यानंतर एप्रिल-मे महिन्यांमध्ये फांद्यांची दुसऱ्यांदा छाटणी करावी. पुढील काळात झाडांची छाटणी दरवर्षी एकदा करावी.

### पीक संरक्षण:

- खोड व फांद्या पोखरणारी अळी: या अळीच्या प्रादुर्भाव विशेषत: मोठया व जून झाडावर आढळून येतो. अळी खोड पोखरून आत शिरते. झाड कमकुवत होऊन उत्पादनात घट होते. प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या बुंध्याजवळ अळीने बाहेर टाकलेली विष्ठा व भुसा दिसून येतो. अशा छिद्रात रोगार किंवा डायक्लोरोवास कीटकनाशकाच्या कापसाचा बोळा ठेवावा व तोंड बंद करावे. यामुळे आतील अळी मरते.
- पाने गुंडाळणारी अळी आणि नागअळी: ही अळी शेवग्याची पाने कुरतडून खाते. यासाठी २ मि.ली. क्लोरोपायरीफोस प्रति १ लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- कॅन्कर: या रोगाच्या प्रादुर्भाव नवीन रोपांवर जून ते ऑगस्ट महिन्यात आढळतो. यामुळे रोपाची मोठ्या प्रमाणावर मर होते. या रोगावर बाविस्टीन (०.१ टक्के) तसेच बोर्डोमिश्रण (०.२५ टक्के) प्रभावी आढळले आहे.
- मर: मर रोग टाळण्यासाठी बिया लागवडीआधी कार्बेन्डेझिमच्या (०.१ टक्के) द्रावणात २४ तास बुडवून ठेवाव्यात. तसेच रोपे उगवून आल्यानंतर १० दिवसांच्या अंतराने चार फवारण्या कराव्यात.

### पिकाचा हंगाम आणि काढणी:

- प्रामुख्याने ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये फुले आणि शेंगा धरण्यास सुरुवात होते आणि मे-जून पर्यंत शेंगा लागतात.
- काही जातीच्या शेंगा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये काढणीस तयार होतात तर काहींच्या मार्च-एप्रिल-मे मध्ये तयार होतात.
- कोवळ्या शेंगांची तोडणी करावी. कोवळ्या शेंगा आकाराने गोल, गर्द हिरव्या रंगाच्या, आकर्षक आणि लुसलुशीत अशा असाव्यात.
- शेंगा फांदीपासून अलगद तोडाव्यात. शेंगा तसेच फांद्या मोडणार नाहीत किंवा त्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.
- शेंगांची काढणी सकाळी किंवा संध्याकाळी करावी. आकार आणि संख्येनुसार शेंगांची वेगवेगळी बंडल (जुड्या) करावेत. पॅकिंग चांगल्याप्रकारे करावे.

### उत्पादन:

- उत्पन्न हे जातीवर आणि मशागतीवर अवलंबून राहते. सर्वसाधारणपणे पहिल्या वर्षी उत्पादन कमी मिळते. पुढील वर्षापासून उत्पादन वाढीव मिळते.
- सुधारीत जातीच्या लागवडीपासून ९ ते १५ टन प्रती हेक्टरी उत्पादन मिळते.

★ ★ ★

(संपर्क: +९१ )



## संत विचार

करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ॥१॥
शुद्धबुद्धि होय दोघां एक मान । चोरसवें कोण जिवें राखे ॥ध्रु.॥
आपुलें देऊनी आपुला चि घात । न करावा थीत जाणोनियां ॥२॥
देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥३॥
तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ॥४॥

अर्थ:
एखाद्या व्यक्तिने दुसर्याला एकादशी व्रत करावयास लावणे तर तो पुण्याच्या वातेकरि होतो, पण व्रत मोडले गेले की ते दोघेही नरकात जातात ॥१॥
सद्बुद्धि असलेल्या माणसाची संगती केलि की मांसन्नमान मिळतो, चोरांची संगती केलि तर शिक्षा मिळते ॥ध्रु॥
आपल्या जावाळील सर्वस्व देऊन आपलेच अहित करुण घेऊ नये, आपले हित ओळखावे ॥२॥
सद्बुद्धि असलेल्या माणसाला काशी-वारानाशिला जाण्यास मदत करावी-पण चोराला चंद्रबळा (चोरीची वेळ) सांगू नये ॥३॥
तुकोबा म्हणतात, तप, तीर्थ, व्रत, यज्ञयाग हे भक्तिमार्ग आहेत. हे कधी सोडु नये ॥४॥